# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
Date – 08 June 2023
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०८ जून २०२३ सायंकाळी ६.१०**

****

- नैऋत्य मोसमी पावसाचं केरळमध्ये आगमन, लवकरच महाराष्ट्रात दाखल होणार.
- द्वैमासिक आर्थिक पतधोरणात रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्यांवर कायम.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर.

आणि

- कसोटी क्रिकेट अजिंक्यपद सामन्यात ऑस्ट्रेलियाची मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल.

****

नैऋत्य मोसमी पावसाचं आज केरळमध्ये आगमन झालं. भारतीय हवामान खात्यानं याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. केरळच्या बहुतांश भागांमध्ये आज सकाळपासून पाऊस सुरू झाला आहे. मान्सूनला यंदा तब्बल सात दिवस विलंब झाला आहे. लवकरचं महाराष्ट्रातही मान्सूनचं आगमनं होईल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तळकोकणात १६ जून किंवा त्यानंतरच मान्सून दाखल होईल, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. दरम्यान, अरबी समुद्रात बिपरजॉय चक्रीवादळ आज अजून तीव्र झालं आहे. येत्या तीन दिवसांत ते उत्तरकडे सरकणार आहे. मराठवाड्यासह कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उद्यापासून तीन दिवस वादळी वाऱ्यासह मध्यम ते हलका पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज द्वैमासिक आर्थिक पतधोरण जाहीर केलं. यामध्ये रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. व्याज दरातही कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याची माहिती, बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. स्थायी ठेव सुविधा अर्थात एसडीएफ दर सहा पूर्णांक २५ शतांश टक्के कायम ठेवला आहे. आधीच्या सहा पूर्णांक ७५ शतांश टक्यांचा सीमांत स्थायी सुविधा आणि बँक दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्राप्त मुल्यांकनानुसार २०२३-२४ मध्ये महागाई चार टक्क्यांच्या वर राहील तर सर्व घटकांचा विचार करुन चलनवाढ २०२३-२४ साठी पाच पूर्णांक एक दशांश टक्के राहण्याचा अंदाज असल्याचं त्यांनी सांगितलं. आरबीआयनं दोन हजार रुपयांची नोट चलनातून परत घेतल्यानंतर मे च्या तिसऱ्या आठवड्यापासून चलनातील घट आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे प्रणालीतली तरलता वाढली आहे. बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दोन हजार रुपयांच्या नोटा जमा झाल्यामुळं या तरलतेत आणखी वाढ झाल्याचं ते म्हणाले. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक गेल्या सहा जून पासून मुंबईत सुरू होती. त्यानंतर आज द्वैमासिक आर्थिक धोरण जाहीर करण्यात आलं. आरबीआयनं दोन हजार रुपयांची नोट चलनातून परत घेतल्यानंतर आर्थिक धोरण समितीची झालेली ही पहिलीच बैठक होती.

****

देशात नागरिकांनी दोन हजार रुपयांच्या ५० टक्के नोटा जमा केल्या तसंच अन्य चलनात बदलून घेतल्या असल्याचं, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी म्हटलं आहे. सुमारे तीन लाख ६२ हजार कोटी रुपये मूल्याच्या दोन हजार रुपयांच्या नोटा वापरात होत्या त्यापैकी एक लाख ८० हजार कोटी मूल्याच्या नोटा जमा करण्यात आल्या तसंच बदलण्यात आल्या आहेत. नागरिकांनी त्वरीत दोन हजार रुपयांच्या नोटा बँकेत जमा कराव्या किंवा बदलून घ्याव्यात, असं आवाहनही दास यांनी केलं आहे.

****

जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस यांनी त्यांच्या शिष्टमंडळासह आज मुंबई इथं नौदलाच्या पश्चिम विभागीय मुख्यालयाला भेट दिली. त्यांना यावेळी नौदलाच्या या विभागाच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. भारतातले जर्मनीचे राजदूत डॉ. फिलिप अकरमन यांच्यासह अनेक उच्चपदस्थ या भेटीवेळी उपस्थित होते.

पिस्टोरियस यांनी काल मुंबईत नौदल प्रमुख ॲडमिरल हरी कुमार यांच्याशी संवाद साधला. भारत आणि जर्मनीनं २००६ मध्ये द्विपक्षीय संरक्षण सहकार्य करारांवर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर संरक्षण सहकार्याबाबत परस्परसंवादात लक्षणीय वाढ झाली असून सागरी क्षेत्रातलं सहकार्य हा यातला महत्वाचा भाग आहे.

****

अवसायनातल्या वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेतल्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी प्राधान्यानं द्याव्यात असे निर्देश सहकार मंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत. त्यांच्या उपस्थितीमध्ये आज मुंबईत या संबंधी बैठक झाली, त्यावेळी सावे बोलत होते. एक लाख ते पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेव रकमांची निश्चिती करुन त्या तत्काळ परत करण्याचं प्रमाण निश्चित करावं असंही त्यांनी यावेळी सांगितलं. सहकार आयुक्त स्तरावर दरमहा बँकेच्या कर्ज वसुली आणि ठेवी परत करण्याबाबत बैठक घेऊन कार्यवाही करावी आणि याबाबत कृती आराखडा तयार करून एक रकमी परतफेड योजनेला मान्यता देऊन कर्जवसुली करावी, अशा सूचनाही सावे यांनी केल्या आहेत.

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल आज जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. भारती गवळी यांनी ही माहिती दिली. मार्च-एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या बी.ए, बी.एस्सी, बी.कॉम अभ्यासक्रमांसह उर्वरित अभ्यासक्रमांचे निकालही आज घोषित करण्यात आले. बीड, उस्मानाबाद, जालना, औरंगाबाद या चार जिल्ह्यांत मिळून २३ केंद्रावर मुल्यांकन करण्यात आल्याचं यावेळी स्पष्ट करण्यात आलं.

****

शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांना अब्रुनुकसानीच्या दाव्याप्रकरणी पुण्यातल्या शिवाजीनगर न्यायालयानं समन्स बजावले आहे. या अंतर्गत त्यांना येत्या १३ जुलैला न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी त्यांच्याविरुद्ध शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयात दिवाणी आणि फौजदारी स्वरुपाचा दावा दाखल केला होता. अंधारे यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्या प्रकरणाच्या आरोपात शिरसाट यांची पोलीस

उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली होती. त्यात त्यांना निर्दोष ठरवण्यात आलं होतं.

****

केंद्र सरकारच्या नऊ वर्षपूर्ती निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीनं औरंगाबादमध्ये "संवाद से संपर्क" अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज विविध समाज घटकांशी संवाद साधला आणि केंद्र सरकारनं नऊ वर्षाच्या कालावधीमध्ये केलेल्या लोक कल्याणकारी योजनांची माहिती दिली. भारतीय अर्थव्यवस्था, गरीब कल्याण योजनाची माहितीही डॉ.कराड यांनी यावेळी दिली.

****

जालना जिल्हा कृषी विभागानं दोन कृषीसेवा केंद्राचे परवाने रद्द केले असून, ३७ कृषीसेवा केंद्र चालकांना तात्पुरती विक्री बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. कापसाच्या बियाणांच्या विशिष्ट वाणांची चढ्या दरानं होत असलेली विक्री आणि खरेदी-विक्रीच्या नोंदीत तफावत आढळल्यानं ही कारवाई करण्यात आल्याची माहिती जिल्हा कृषी अधिकारी गुणवंत कापसे यांनी दिली आहे. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आता जिल्ह्यात कापसाच्या वाणांची विक्री कृषी विभागातल्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी कापसाच्या बियाणांच्या विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये, असं आवाहन जिल्हा कृषी विभागानं केलं आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या औरंगाबाद शाखेचा ३८ वा वर्धापन दिन पक्षाचे नेते संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत आज विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. संत एकनाथ रंग मंदिरामध्ये मेळावा घेण्यात येत आहे. शिवसेना हा कधीही न संपणारा पक्ष असून आगामी काळात पक्ष सोडून गेलेल्यांना त्यांची जागा दाखवून देण्यात येईल, असा इशारा विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी यावेळी दिला. औरंगाबाद शहराचा विकास थांबलेला आहे. योजनांच्या नुसत्या घोषणा झालेल्या असल्याची टीकाही त्यांनी केली. नव्या पाणी पुरवठ्याची योजना तीन किलोमीटरच्या वर झालेली नाही, बाळासाहेब ठाकरेंचं स्मारक, सफारी पार्क या सगळ्या योजना रखडल्या असल्याचा आरोप दानवे यांनी यावेळी केला.

****

औरंगाबाद शहरातल्या बाजारपेठ, हॉटेल, बार रात्री साडे बारा वाजेपर्यंत सुरू ठेऊ द्यावेत, अशी मागणी जिल्हा व्यापारी महासंघ आणि हॉटेल व्यावसायिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांच्याकडे केली आहे. पर्यटन नगरी असणाऱ्या शहरांमध्ये पर्यटकांची गैरसोय होऊ नये यासाठी रात्री उशिरापर्यंत हॉटेल आणि बार चालू ठेवावेत, असं त्यांनी सूचवलं आहे.

****

भारताविरुद्धच्या कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेतल्या अंतिम सामन्यात आज ऑस्ट्रेलियानं सात

बाद ४३१ धावा केल्या आहेत. लंडनच्या ओव्हल मैदानावर सुरू या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी उपाहाराला खेळ थांबला तेंव्हा ऑस्ट्रेलिया संघाच्या सात बाद ४२२ धावा झाल्या होत्या. कालच्या तीन बाद ३२७ धावांवरुन संघानं पुढं खेळायला सुरुवात केली. स्टीव्ह स्मीथच्या १२१ आणि ट्रॅव्हीस हेडच्या १६३ धावांमुळं ऑस्ट्रेलिया संघानं मोठी धावसंख्या उभारण्याच्या दिशेनं वाटचाल सुरू ठेवली. मोहम्मद सिराज, मोहम्मद शमी आणि शार्दूल ठाकूरनं प्रत्येकी एक गडी बाद केला.

****

नाशिक इथून पंढरपूरला जाण्यासाठी उद्या सायकल वारी निघणार आहे. राज्यातून पाच हजार सायकलपटू या वारीत सहभागी होतील असं नाशिक जिल्हा सायकल संघटनेनं म्हटलं आहे. हे सायकलपटू आपल्या वारी मार्गात पर्यावरणाच्या दृष्टीनं संदेश देणार असून पथनाट्य सादर करणार आहेत. पंढरपूर इथं सायकलपटू पंढरपूर नगरीची प्रदक्षिणा करुन रेल्वे मैदानावर रिंगण करतील. याच ठिकाणी त्यांचं संमेलन देखील होणार आहे. सायकल संघटनेच्या महासंघाची यावेळी स्थापना करण्यात येईल, असं संघटनेनं कळवलं आहे.

****

श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा येत्या १८ ते २३ जून या कालावधीत सातारा जिल्ह्यातून पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे.

****